**नि.फौ.ख.क्र. २८४/२०२२**

**सरकार –वि– नानासाहेब आहेर**

**निशाणी क्र. १८**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ योगेश बाळू आहेर यांचा उर्वरित उलटतपास आरोपीचे विधिज्ञ श्री. पी. के. पाटील यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

१०. मी व माझी आई चांदवड न्यायालयामध्ये सन १९९९ पासून येतो. हे म्हणणे खरे आहे की त्यामुळे मला व माझ्या आईला कोर्ट कामकाजाविषयी माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की तथाकथित घटनास्थळाजवळ साहेबराव पवार, दिनकर आहेर, सूर्यभान आहेर, पंडित महाले यांची घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की तथाकथित घटनास्थळाच्या पाठीमागे साहेबराव शिंदे, अंबादास आहेर, रामदास आहेर यांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की तथाकथित घटनास्थळाच्या पश्चिमेला एकनाथ कुंभार्डे, बाजीराव कुंभार्डे, दिलीप कुंभार्डे यांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की पुलाच्या पाठीमागे कोंबडवाडी वस्ती आहे. कोंबडवाडी वस्तीमध्ये चार ते पाच घरे आहेत.

११. हे म्हणणे खरे आहे की रोहीदास महाले यांच्या घरभरणी कार्यक्रमासाठी मी गेलो होतो हे दाखवण्यासाठी माझ्याकडे माझ्या तोंडी शब्दांव्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की घटनेदिवशी मी अंबादास आहेरच्या किराणा दुकानामध्ये गेलो होतो हे दाखवण्यासाठी माझ्याकडे माझ्या तोंडी शब्दांव्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा नाही.

१२. फिर्याद माझ्या आइने दिलेली आहे असे मी जे सरतपासात नमूद केलेले आहे ते खरे आहे. हे म्हणणे खरे नाही की मी व माझ्या आईने दोन फिर्याद दिल्या. माझ्या सरतपासामध्ये माझ्या आईने व मी फिर्याद दिल्याचे नमूद आहे तो मजकूर खरा आहे. हे म्हणणे खरे नाही की मी दिलेली फिर्याद खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझ्या आईने दिलेली फिर्याद घेतली नाही.

१३. मी शेती करतो. शेतीसाठी नांगर, वखर, पांबर अशी अवजारे लागतात. हे म्हणणे खरे आहे की वखरला अडीच ते तीन फुटांची पास असते. हे म्हणणे खरे आहे की वखरीचा उपयोग शेती वखरण्यासाठी केला जातो. हे म्हणणे खरे नाही की घटनेदिवशी मी शेतीमध्ये वखरण्याचे काम करत होतो. हे म्हणणे खरे नाही की शेतामध्ये काम करत असतांना मी वखरीच्या पासावर पडलो व त्यामुळे माझ्या दोन्ही हातांना मार लागला.

१४. हे म्हणणे खरे नाही की माझे व माझ्या आईचे शेतीच्या वाटपावरुन माझ्या वडीलांविरुद्ध व आरोपींविरुद्ध वाद असल्यामुळे मला कोर्ट कामकाजाची माहिती असल्याचा गैरफायदा घेऊन मी आरोपीविरुद्ध सदरचे खोटे प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की घटनेदिवशी मी रोहीदास महालेच्या घरभरणीसाठी गेलो नव्हतो तसेच घटनेदिवशी मी अंबादास आहेरच्या किराणा दुकानात गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की घटनेदिवशी आरोपी मला तु आमच्या भावाच्या पोटचा नाहीस, तु आमची जमिन फुकट लाटायला निघाला आहेस, असे म्हटल्याचे खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की घटनेदिवशी आरोपी पाठीमागून आला व त्याने कोयत्याने माझ्या हातावर वार करुन मला जखमी केल्याचे मी खोटे कथन

केले आहे. हे म्हणणे खरे नाही की घटनेवेळी तुषार महाले ट्रॅक्टरचे डिझेलचे आणण्यासाठी घटनास्थळाजवळून जात होता हे मी खोटे कथन केले आहे.

१५. हे म्हणणे खरे नाही की सदर प्रकरणातील सर्व साक्षीदार, पंच हे माझे मावसभाऊ व नातेवाईक आहेत व आम्ही सर्वांनी संगनमताने आरोपीविरुद्ध सदरचे खोटे प्रकरण दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.11.19 13:25:36 +0530

**दि. १९.११.२०२५**

**(वृषाली दी. सुंगारे)**

**सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**क.स्तर चांदवड.**